# प्रेस नोट

वडाळा ट्रक टर्मिनल पोलीस ठाणे, मुंबई. येथे दिनांक ०४/०२/२०२५ रोजी गु.र.क्र. ७२/२०२५ कलम ३१८ (४), भा.न्या.सं. २०२३ सह कलम ६६(d) मा.तं.अधि. २००० प्रमाणे गुन्हा नोंद आहे सदर गुन्ह्याची थोडक्यात हकीकत अशी की, यातील फिर्यादी यांचा वाढदिवस असल्याने त्यांना त्यांच्या मित्र व नातेवाईकांना पार्टी देणेकामी लोणावळा येथे भाडेतत्वावर व्हिला बुक करायचा होता. सदरबाबत त्यांनी वेगवेगळ्या साईटस व इन्स्टाग्रामवर भाडेतत्वावर व्हिला देणाऱ्यांचा शोध घेतला असता त्यांना इन्स्टाग्रामवर blissifystays नावाने प्रोफाईल व https://blissifystays.com या नावाची वेबसाईट मिळून आली. सदर इन्स्टाग्राम प्रोफाईल व वेबसाईटवर नमुद असलेले मोबाईल क्रमांकावर त्यांनी संपर्क साधला असता अनोळखी व्यक्तीने त्यांना व्हिला बुकिंग करिता अॅडव्हान्स व डिपॉझिट रकमेपोटी वेगवेगळ्या ट्रान्झेक्शनद्वारे एकूण रक्कम रुपये १६०००/- घेतले त्यानंतर फिर्यादींचा फोन उचलणे बंद केले व त्यांना ब्लॉक केले. फिर्यादींना त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर तक्रार नोंद केली. त्यानंतर फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीवरुन सदरबाबत गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्ह्यामध्ये ऑनलाईन फसवणुक करण्याकरीता वापरण्यात आलेले मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करुन पाहिजे अनोळखी आरोपीचा शोध घेतला असता तो मिळून आला. त्याचेकडे दाखल गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्याचा गुन्ह्यामध्ये सहभाग निष्पन्न झाला असून त्यास दिनांक ०६/०२/२०२५ रोजी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली. अटक आरोपीकडून गुन्हा करणेकरीता वापरलेले ०३ मोबाईल फोन व ०४ सीमकार्ड हस्तगत करण्यात आलेले आहेत. गुन्ह्यामध्ये वापर करण्यात आलेल्या मोबाईल क्रमांकाविरोधात NCRP पोर्टलवर महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी एकूण १० तक्रारी दाखल असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे. अटक आरोपीस रिमांडकामी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, २९ वे न्यायालय, शिवडी यांचे न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास दिनांक १०/०२/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केलेली आहे.

अटक आरोपीचे नाव व पत्ता - अल्तमस अहमदअली शेख वय २१ वर्षे, रा. रुम नं. ९०७, स्टार टॉवर, लल्लूभाई कंपाउंड, मानखुर्द, मुंबई.

सदरची कारवाई श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. सत्यनारायण, सह पोलीस आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई, श्री. अनिल पारस्कर, अप्पर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, श्रीमती रागसुधा आर., पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, मुंबई, श्री. शैलेश धिवार सहायक पोलीस आयुक्त, सायन विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री. रमेश जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. धनंजय शिंदे पोलीस निरीक्षक, अमोल सावंत सहायक पोलीस निरीक्षक, सायबर पथक, पोहवा ०३०४०७/जाधव, पोशि ०९१६९०/गजभारे वडाळा टी टी पोलीस स्टेशन यांनी केलेली आहे.

(रागसुधा आर.)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ ०४, मुंबई.

Scanned with CamScanner